दूरध्वनीक्रमांक:
०२०२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
Website:www.unipune.ac.in
e-mail :coe@unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ ७८१

दिनांक : १४/१२/२०२२

तातडीचे व महत्वाचे

प्रति,

१. मा.पोलीस आयुक्त,
पुणे शहर / नाशिक शहर

२. मा.पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण / अहमदनगर जिल्हा व नाशिक ग्रामीण

विषय :- विद्यापीठ परीक्षा ऑक्टोबर २०२२ (आयोजन डिसेंबर २०२२ / जानेवारी २०२३)

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षा पुणे शहर, पुणे ग्रामीण, नाशिक शहर, नाशिक ग्रामीण, अहमदनगर शहर व अहमदनगर जिल्हयातील अनेक परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सन २०२२ च्या द्वितीयार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या लेखी परीक्षा दिनांक २७/१२/२०२२ पासून सुरू होत आहेत. या परिक्षा विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थामधून जवळपास ९०० परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेला आहेत.

विद्यापीठामार्फत २७ डिसेंबर २०२२ पासुन आयोजित करण्यात येणाऱ्या निरनिराळया परिक्षांचा कार्यक्रम टप्या टप्याने जाहीर करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या परिक्षा अत्यंत शिस्तबध्द व निकोप वतावरणात पार पाडण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्रप्रमुख, प्राचार्य / वरिष्ठ पर्यवेक्षक यांना तसेच विद्यापीठाला पोलीस विभागाची यापूर्वी आवश्यकतेनुसार सहकार्य मिळालेले आहे. तसेच सहकार्य सन २०२२ च्या द्वितीयार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या निरनिराळ्या परीक्षांच्या दरम्यान कृपया मिळावे.

तरी कृपया विद्यापीठाच्या उपरोक्त परीक्षा चालू असेपर्यंतच्या कालावधीत शहरांच्या व जिल्हयातील संबंधित परीक्षा केंद्राच्या ठिकाणी तसेच परिक्षा केंद्रांचे केंद्रप्रमुख, प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांना गरजेनुसार पोलीस सहकार्य कृपया उपलब्ध करुन द्यावे व तशा सूचना आपल्या विभागातील सर्व संबंधितांना द्याव्यात अशी विनंती आहे.

विद्यापीठाच्या निरनिराळ्या परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण विद्यापीठास वेळोवेळी सहकार्य केलेले आहेच, ते यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे.

कळावे,

आपला,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :-

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये

२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

विद्यापीठ परीक्षांचे आयोजन व्यवस्थित व निकोप वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची / संस्थेची आहे. याकरिता आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त नजिकच्या पोलीस चौकीकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा. महाविद्यालयामध्ये / संस्थेमध्ये पोलीस बंदोबस्ताची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहील.